# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ
## विभागीय कार्यालय, पुणे

(स्वायत्त) (ISO 9001:2008)

४१२/डी, बहिरट पाटील चौक, पुणे – ४११ ०१६.

दू.क्र. : ०२०–२५६५६९९४/२५६६०३१९ फॅक्स : ०२०–२५६५२३०८

ई–मेल : rbtepn@msbte.com संकेत स्थळ : www.msbte.com


जा.क्र.मरातंशिम/विकापु/रोखपाल /२०१७/ १८१० दिनांक : - 7 NOV 2017

**ई–परिपत्रक** **स्मरणपत्र क्र.१**

प्रति,

प्राचार्य,
पुणे विभागातील सर्व संलग्नित पदविका अभ्यासक्रमांच्या संस्था.

विषय– MSBTEBIll.com या वेबसाईटवर संस्थेतील अधिकारी व कर्मचारी यांची माहिती भरणेबाबत.

संदर्भ :– या कार्यालयाचे परिपत्रक क्र.मरातंशिमं/विकापु/रोखपाल/2017/1652 दि.29/9/2017.

उपरोक्त विषयाच्या विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, शैक्षणिक सत्र 2017–18 मध्ये आपल्या संस्थेत बदलून आलेल्या व संस्थेत कार्यरत असून MSBTEBIll.com या वेबसाईटवर माहिती भरलेली नाही अशा अधिकारी व कर्मचा–यांची माहिती तात्काळ दि. 04/10/2017 पर्यंत भरुन, ती तपासून त्यावर संबंधीत आधिकारी/ कर्मचारी यांची स्वाक्षरी घेऊन माहिती बरोबर असल्याची खात्री करावी.

ती स्वाक्षरी घेतलेली माहीती या कार्यालयास प्राचार्यांच्या हमी पत्रासह स्पीडपोस्टाने दि. 08/10/2017 पर्यंत तात्काळ सादर करणेबाबत संदर्भिय परिपत्रकान्वये कळविण्यात आलेले होते. तरीही अदयाप काही संस्थांची माहिती व हमीपत्र या कार्यालयास प्राप्त झालेले नाही. तरी ज्या संस्थांनी माहिती सादर केलेली नाही. त्यांनी दि.13/11/2017 अखेर हमीपत्रासह माहिती या कार्यालयास सादर करावी, जेणेकरुन RBTE कडून देय होणारे मानधन त्वरीत अदा करणे सोईचे होईल.

शैक्षणिक सत्र 2016–17 मध्ये आपण भरलेल्या अधिकारी/ कर्मचा–यांच्या माहितीमध्ये ब–याच प्रमाणात चूका आढळून आलेल्या आहेत. विशेष करुन बॅक खाते कमांक व बॅकेचा IFSC Code. त्यामुळे ब–याच अधिकारी/कर्मचा–यांचे मानधन अदा करण्याचे कार्यवाहीस या कार्यालयास अडचण निर्माण झाली आहे.

त्यामुळे यावेळेस माहिती भरताना संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचे कॅन्सल चेक स्विकारुन त्यावर असलेलेच बॅक खाते कमांक व बॅकेचा IFSC Code ची माहिती भरावी. जेणेकरुन या शैक्षणिक वर्षातील सर्व प्रकारचे मानधन त्वरीत अदा करणे सोईचे होईल.

तसेच आपल्या संस्थेत कार्यरत असलेल्या सर्व अधिकारी/कर्मचा–यांची माहिती भरुन तसेच सोबत जोडलेले हमीपत्र प्राचार्यांनी यादीसोबत या कार्यालयास सादर करणे बंधनकारक आहे. आपण माहिती सादर केल्या नंतर आपल्या संस्थेत कोणत्याही अधिकारी/कर्मचारी यांचे RBTE कडून देय असलेल्या मानधना पासून वंचित राहिले तर त्याची संपूर्ण जबाबदारी आपणावर राहील, याची विशेष नोंद घ्यावी.

सोबत :– हमीपत्राचा नमुना.

7/11/17

(डॉ. एम.आर.चितलांगे)
उपसचिव,
म.रा.तं.शि.मं.वि.का.पुणे–16

# हमीपत्र

मी,.................................................................................... प्राचार्य ....................................................................................
असून माझ्या संस्थेमध्ये कार्यरत असलेल्या सर्व अधिकारी/कर्मचा–यांची माहिती MSBTEBILL.com या वेबसाईटवर भरलेली असून ती माहिती मी स्वतः सर्व संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचे निदर्शनास आणून देऊन ती बरोबर असल्याची खात्री त्यांचे कॅन्सल चेक वरुन करुन घेतली असून आणि संबंधितांची स्वाक्षरी घेतली आहे. तसेच यापुढे संबंधित माहिती मध्ये त्रुटी आढळल्यास संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांना RBTE कडून देय असलेले मानधन त्यांचे बॅंक खात्यावर ऑनलाईन पध्दतीने अदा न झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधितांची व माझी राहील.

संस्थाप्रमुखाची सही व शिक्का